राज्यसेवा मुख्य परीक्षा - 2014

**FO4**

परीक्षा दि: 30/05/ 2014

# विषय : मराठी

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** **एकूण गुण : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** **कालावधी : 3 तास**

**सूचना :**

*(i)* **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.

*(ii)* प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

*(iii)* तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.

*(iv)* उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

*(v)* उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्नांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. प्रश्नातील एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा दुर्लक्षित केला जाईल.

SEAL

**1.** खाली दिलेल्या विषयावर **1000** शब्दांचा निबंध लिहा. 50

'प्रजासत्ताक व्यवस्था : किती वास्तव किती आभासी'.

**2.** खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा. 25

Russia's occupation of Crimea and its military threat to Ukraine's sovereignty have suddenly challenged the commonly-held assumption that the era of territorial annexation ended in 1991, when the world's collective action reversed Iraq's attempt to swallow Kuwait. Those concerned about China's aggressive claims fear the Crimea precedent may have emboldened Beijing in its attempt to set up a giant oil drilling rig within Vietnam's territorial waters claimed by China. Apart from urging restraint on both sides world powers are reluctant to complicate their important relations with China. By employing its law-enforcement vessels rather than navy ships, and water cannons rather than guns, China too wants to keep the conflict at a low boil.

www.reliableacademy.com 9222333999

The muted response to Russia and China's aggressive actions seem to underscore that in an increasingly interdependent world, the power of the state is ever more constrained. The mesh of economic interdependence that deters collective response to egregious behaviour offers some freedom of action to those who dare to challenge the existing order - but only up to a point. Both China and Russia's aggressive yet cautious behaviour underlines an awareness of the limits of their action without incurring the very high cost of tearing up the economic mesh.

Despite tough talk in Washington, nobody is seriously considering a military response to Russia's absorption of Crimea. Even the limited sanctions on Russia that were adopted by the US and its European allies incurred criticisms by businesses and politicians. China's attempt to bully Vietnam similarly has caused unease among its Asean neighbours but no reaction that would upset their economic ties with Beijing.

It is not hard to understand why. Since the collapse of communist rule, Russia has been largely integrated into the world economy. Not only does it supply one-third of the gas needed by Europe, its rare minerals supply the needs of western manufacturing. If Russian supplies of titanium were disrupted, so too would be the production of Boeing 787 Dreamliner, which requires the alloy to build its fuel-efficient airliner. Top German companies which count Russia among valued customers have expressed concerns about the impact of sanctions. Major western oil companies have lucrative contracts with Russia's state-owned oil giant Rosneft.

One cannot also ignore the potential political costs of isolating Russia while the West tries to deal with the Syrian crisis, the Iranian nuclear challenge and the morass of Afghanistan following Nato's withdrawal. Russian rockets currently provide the only means of transporting astronauts and material to the International Space Station.

This is not to say Moscow doesn't face its own challenges. Russia too has learned the high cost of its military ventures as capital flees ($51 billion in the first quarter), stock markets decline and prices of imported goods shoot up. Russia's dependence on oil and gas revenues (65% of exports and 35% of revenue) makes sustained sanctions a particularly unwelcome prospect. Russia's future productivity growth and investment would require greater integration with the world economy. Such a course would obviously be jeopardised if Russia were to intervene to create a client state in southeast Ukraine. Whether or not Putin's recent soft line is a tactical feint, the economic mesh of globalisation tying Russia's fate with the rest of the world should prevent the Ukraine crisis from escalating further.

Compared to Russia, China's economic integration with the world is multiple times wider and deeper. As the second-largest economy and the largest exporter, China's economic fate is intimately linked to that of the rest of the globe. While food, fuel and raw materials from the world feed China's growth, the country's export juggernaut and massive investment abroad (China's e-commerce giant Alibaba's billion dollar IPO in New York is expected to reach record valuation) underwrite its prosperity.

www.reliableacademy.com 92223999

3. खाली दिलेल्या उताऱ्याचे 1 / 3 शब्दांत सारांशलेखन करा. उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. 15

**सूचना :** विहित शब्दमर्यादेपेक्षा सारांश लेखन जास्त अथवा कमी झाल्यास योग्य ते गुण वजा करण्यात येतील.

'पसायदान' हे विश्वगीत आहे. या अपूर्व प्रार्थनेच्या द्वारे श्री ज्ञानदेवांनी समाजाच्या कल्याणाचे काही मूलसिद्धान्त 'आदर्श' म्हणून आपल्यासमोर ठेवले आहे. आदर्श हे नेहमीच उंचावर असतात, पण त्या आदर्शांचे केवळ अस्तित्व हेच मानवी जीवनाला आपल्या परीने आकार देते. ध्रुव ताऱ्याच्या प्रकाशात आपल्याला आपले सर्व व्यवहार करता येत नाहीत; पण त्याच्या स्थिर आस्तित्वाने दिशा कळते! तेच स्थान आपल्या जीवनात आदर्शांचे आहे.

दुर्दैवाने समाजात असा एक वर्ग असतो की त्याला आदर्शाची कल्पनाच नसते आणि त्याची गरजही त्याला वाटत नाही. ''या जगात काय चांगले असणार? सध्याच्या जीवनात चांगले काही असूच शकत नाही, जग असेच चालणार. त्यात आपणही भोगता येईल तेवढे जीवन भोगावे व साधता येईल तेवढे साधावे आणि एके दिवशी संपून जावे झाले!'' अशा विचारावर जगणारे लोक इतरांच्या जीवनात दु:ख तर निर्माण करतातच; पण स्वत:ही आयुष्यभर शुध्द आनंदापासून वंचित राहतात. ज्याच्या जीवनाला ध्येय नाही आणि त्या ध्येयाला सर्वांच्या कल्याणाच्या तत्वज्ञानाचा आधार नाही, तो मानवरूपाने जगात वावरणारा पशूच असतो. तो कितीही सुशिक्षित, विद्वान, अद्ययावत राहणारा, चोखंदळ, रसिक असला तरी त्याच्या कातड्याच्या आत 'मनुष्य' नसतो. फार तर तो एक वरच्या दर्जाचा सुधारलेला 'प्राणी' असतो एवढेच काय ते! 'मनुष्य' म्हणून जगायचे असेल तर मूल्याधिष्ठित आदर्शांचा स्वीकार करावाच लागतो.

मानवी समाजाच्या कल्याणाची अनेक तत्वज्ञाने आहेत. त्यांच्यामध्ये परिस्थितीनुसार गुणदोष निर्माण होतात. पण संतांनी जे मानवी जीवनाचा आधार म्हणून अनुभवसिद्ध अध्यात्म तत्वज्ञान दिले ते सर्वश्रेष्ठ व निर्दोष आहे. ज्ञानदेवांनी 'पसायदाना'त समाजातील आदर्शहीन, ध्येयहीन आणि तत्वज्ञानहीन खलांचा दुष्टपणा नष्ट होऊन 'ईश्वरनिष्ठ मांदियाळी' निर्माण व्हावी, सज्जन सोयरे म्हणजे सर्वांचे आवडते व्हावे, जो जो जी जी इच्छा करेल ती पूर्ण व्हावी, मानवसमाजाचे जीवन पूर्ण सुखी व्हावे' हेच मागणे विश्वात्मक देवाजवळ केले आहे. आदर्श तत्वांचा अंगिकार केल्यानेच ध्येय गाठता येते व सर्वसमाजाचा उत्कर्ष होतो ही जाण विकसित करणारे 'पसायदान' आहे. विचारपूर्वक आपण त्याचा अर्थ समजवून घेतला पाहिजे या प्रार्थनेने 'जग किती सुधारले' असे आपण विचारतो. त्याआधी 'आपण स्वत: किती सुधारलो' हे विचारले पाहिजे. आपल्यात आधी पसायदानात सांगितल्याप्रमाणे सुधारणा घडवून आणा, तेवढ्या प्रमाणात जग सुधारलेले तुम्हाला दिसेल!

प्रार्थना ही आदर्शाकडे जाण्याची प्रेरणा जिवंत ठेवीत असते. आपली निष्ठा जागृत ठेवते. माणसाला आपल्या ध्येयाचे नित्य स्मरण देऊन त्याला खाली घसरू देत नाही. दैनंदिन जीवनात प्रार्थनेमुळे सद्‌विचारांची बीजे अंत:करणात पेरली जातात. आपण राष्ट्रगीत म्हणतो तेव्हा आपल्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आधार असलेल्या आपल्या देशाविषयी निष्ठा दृढ होत जाते. 'तो देश चांगला बनविला पाहिजे' हे ध्येय आपण अंगिकारतो. तसेच या पसायदानाच्या प्रार्थनेनेही जीवनाचा मूलाधार जो परमात्मा त्याच्यावरील निष्ठा वाढते आणि प्राणिमात्रांच्या सर्व सुखाचे ध्येय विकसित होते. आपले व आपल्या भोवतालचे जीवन सुखी होते. आदर्श मूल्यांच्या वाटेवरून चालण्याची प्रेरणा मिळते. समाजजीवनाचा उत्कर्ष होतो. या कार्याचे शक्तिबीज कुठे असेल तर ते पसायदानाच्या प्रार्थनेत आहे. व्यक्ती व समाजाची मूल्याधिष्ठित जडण-घडण करण्याचे सामर्थ्य पसायदानात आहे. त्यासाठी त्याचा अर्थ समजून घेणे आवश्यक ठरते.

**4.** व्याकरण विषयक प्रश्न (उत्तराच्या अचूक पर्यायाची निवड करा.) **10**

(1) पुढील शब्दातील विशेषणाचा प्रकार ओळखा.

'सत्तरावे वर्ष'

(अ) आवृत्तीवाचक संख्याविशेषण (ब) गणनावाचक संख्याविशेषण

(क) क्रमवाचक संख्याविशेषण (ड) पृथकत्ववाचक संख्याविशेषण

(2) पुढील शब्दातील अव्ययाचा प्रकार ओळखा.

'इश्श'

(अ) केवलप्रयोगी अव्यय (ब) उभयान्वयी अव्यय

(क) क्रियाविशेषण अव्यय (ड) धातुसाधित अव्यय

(3) पुढे दिलेल्या सामासिक शब्दाचा समास कोणता आहे?

'चुलतसासरा'

(अ) द्विगू समास (ब) मध्यमपदलोपी समास

(क) द्वंद्व समास (ड) कर्मधारय समास

(4) पुढीलपैकी भावेप्रयोगाचे उदाहरण ओळखा.

(अ) मुलीने कविता वाचली. (ब) सभेत पत्रके वाटली गेली.

(क) सैनिकांनी आता मैदानावर जावे. (ड) पोलीसाकडून चोर पकडला गेला.

(5) पुढे दिलेल्या दोन वाक्यांपासून तयार होणारे संयुक्त वाक्य ओळखा.

(i) मला झोप आली आहे. (ii) मी काम करणार नाही.

(अ) मला झोप आल्यामुळे मी काम करणार नाही.

(ब) मला झोप आली आहे म्हणून मी काम करणार नाही.

(क) मी काम करणार नाही कारण मला झोप आली आहे.

(ड) मला झोप आली ; आता मी काम करणार नाही.

(6) खालीलपैकी कोणत्या वाक्यात आज्ञार्थी क्रियापद आले आहे?

(अ) देवा, सर्वांना सुखी ठेव. (ब) आता पाऊस थांबावा.

(क) पाऊस आला तरी सहल जाणारच. (ड) परीक्षेत मला प्रथम श्रेणी मिळाली.

www.reliableacademy.com 9222333999

(7) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दाचा प्रकार ओळखा.

'एक लक्ष म्हणजे शंभर हजार.'

(अ) केवलप्रयोगी अव्यय (ब) संकेतबोधक उभयान्वयी अव्यय

(क) स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय (ड) क्रियाविशेषण अव्यय

(8) 'त, इ, आ' हे कोणत्या विभक्तीचे प्रत्यय आहेत ?

(अ) पंचमी (ब) सप्तमी (क) षष्ठी (ड) तृतीया

(9) उपमेय व उपमान यांच्यात एकरूपता आहे, ती भिन्न नाहीत असे वर्णन जेथे असेल तेथे कोणता अलंकार असतो ?

(अ) अनन्वय (ब) व्यतिरेक (क) अपन्हुती (ड) रूपक

(10) संस्कृत भाषेतील शब्दांच्या मूळ रूपात बदल होऊन ते मराठी भाषेत आले तर त्या शब्दांना कोणते शब्द म्हणतात ?

(अ) तद्भव शब्द (ब) तत्सम शब्द (क) देशी शब्द (ड) सिद्ध शब्द

-oOo-

www.reliableacademy.com 9222233999